स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना**

गणेशखिंड, पुणे ४११००७

फॅक्स क्रमांक २५६०११५४

रासेयो/२०२२-२३/ **तातडीचे व महत्त्वाचे** दि. ०१/०८/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक
रासेयो जिल्हा व विभाग समन्वयक महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त 'स्वराज्य महोत्सव' व 'हर घर तिरंगा' उपक्रम आयोजनाच्या नियोजन बैठकीला उपस्थित राहणेबाबत**

महोदय/महोदया

भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर 'आजादी का अमृत महोत्सव' या उपक्रमाचे आयोजन करण्याबाबत केंद्र/राज्य शासनामार्फत सूचित करण्यात आलेले आहे. जनतेच्या मनात स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी या उद्देशाने या देदीप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी 'आजादी का अमृत महोत्सव' अर्थात 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' अंतर्गत दि. ११ ते १७ ऑगस्ट या कालावधीमध्ये देशभरात 'हर घर तिरंगा' हा उपक्रम व दि. ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत 'स्वराज्य महोत्सव' हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या दोन्ही उपक्रमांचे औचित्य साधून दिनांक ९ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ विभागाच्या वतीने १,००,००० राष्ट्रध्वजांचे वितरण पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातून सहभागी झालेल्या विविध महाविद्यालयातील प्रातिनिधीक रासेयोच्या ३,००० विद्यार्थ्यांना करण्यात येणार आहे. दिनांक १५ ऑगस्ट २०२२ रोजी याच राष्ट्रध्वजांच्या साहाय्याने तिन्ही जिल्ह्यातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व नागरीक यांच्या सहभागातून विशिष्ट ॲपद्वारे सुमारे १,५०,००० ध्वजारोहणाचे सेल्फी संकलीत करून गिनीजद्वारे जागतिक विश्वविक्रम नोंदवण्याचा प्रयत्न आहे.

वरील प्रमाणे दोन्ही उपक्रम यशस्वीपणे राबवण्याकरिता पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील माननीय प्राचार्य, रासेयो कार्यक्रम अधिकारी व विविमं विद्यार्थी विकास अधिकारी यांची पुढीलप्रमाणे जिल्हानिहाय बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीमध्ये माननीय कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य व अधिसभा सदस्य हे उपस्थित माननीय प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी व विविमं अधिकारी यांना मार्गदर्शन करणार आहेत.

| क्र | विभाग (जिल्हा) | स्थळ | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे व पिंपरी-चिंचवड | पर्यावरणशास्त्र सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | ३ ऑगस्ट २०२२, दुपारी ०३.०० वाजता |
| २ | नाशिक | के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक | ४ ऑगस्ट २०२२, सकाळी १०.०० वाजता |
| ३ | अहमदनगर | सं.न. कला, दा.ज. मालपाणी वाणिज्य आणि ब.ना. सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर, अहमदनगर | ४ ऑगस्ट २०२२, दुपारी ०२.०० वाजता |
| ४ | पुणे ग्रामीण | पर्यावरणशास्त्र सभागृह, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ | ५ ऑगस्ट २०२२, दुपारी ०३.०० वाजता |

तरी सदर नियोजन बैठकीकरिता आपण स्वतः व आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकारी आणि विविमं विद्यार्थी विकास अधिकारी यांच्यासह उपरोक्त ठिकाणी उपस्थित रहावे. नियोजन बैठकीकरिता सहभागी रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना




'हर घर तिरंगा अभियान' मध्ये प्रा. धनंजय जवळेकर जिल्हा परिषद शाळा खर्डा येथे मार्गदर्शन करताना..